मा.सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर शासनामार्फत करावयाच्या कार्यवाहीसाठी शिफारस करण्याबाबत नियुक्त करण्यात आलेल्या करंदीकर समितीची रचना, कार्ये व मानधन निश्चितीबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : जहिया-२०१७/प्र.क्र.१६/२०१७/का.७,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०१७.**

**संदर्भ** : शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक : जहिया-२०१७/प्र.क्र.१६/ २०१७/का.७, दिनांक २९.०९.२०१७.

**प्रस्तावना :**

आदिवासी विकास विभागामार्फत सन २००४ ते सन २००९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध योजनांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांसंदर्भात, श्री.बहिरम पोपटराव पवार व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक १५३/२०१२ च्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक : जहिया-२०१२/प्र.क्र.८०(भाग-४)/का.१६, दिनांक १५ एप्रिल, २०१४ अन्वये गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालाची छाननी करुन, शासनामार्फत करावयाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्याकरीता उपरोक्त नमूद संदर्भाधीन शासन निर्णयान्वये श्री.पी.डी.करंदीकर, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण वेळ एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची कार्ये व मानधन निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

यानुषंगाने, शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय :-

मा.सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाची छाननी करुन, या अहवालाच्या अनुषंगाने शासनामार्फत करावयाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्याकरीता श्री.पी.डी.करंदीकर, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण वेळ एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

२. सदर समितीचे अध्यक्ष श्री.पी.डी.करंदीकर यांना सहाय्य करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती असणाऱ्या अधिकाऱ्याच्या नियुक्तीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असे संदर्भाधीन आदेशामध्ये नमूद करण्यात आले होते. त्यानुषंगाने, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचा सदस्य म्हणून आणि आयुक्त, आदिवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे यांचा सदस्य सचिव म्हणून या समितीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

३. त्याचप्रमाणे, समितीच्या कामकाजाकरीता समितीमध्ये सहायक अधिकारी म्हणून, अधिकारी दर्जाच्या व्यक्तींचा समावेश समितीमध्ये करण्याबाबतचे अधिकार श्री.करंदीकर यांना सुपूर्द करण्यात येत आहे. तसेच, समितीच्या कार्यालयीन कामकाजाकरीता लागणारे आवश्यक मनुष्यबळ (उदा. सहायक, स्टेनो, लिपिक, शिपाई इ.) समितीच्या कालावधीत कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबतचे अधिकारसुध्दा श्री.करंदीकर यांना सुपूर्द करण्यात येत आहेत.

४. श्री.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीची रचना व कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील :-

- श्री.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली, सदर समिती ही आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीत काम करेल;
- सदर समितीमध्ये श्री.करंदीकर यांना सहाय्य करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे सदस्य म्हणून आणि आयुक्त, आदिवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील;
- या समितीचा कालावधी हा सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा राहील;
- या समितीस घालून देण्यात आलेली सहा महिन्यांची मुदत संपुष्टात आल्यानंतर, सदर समितीस मुदतवाढ देण्यात येणार नाही;
- ही समिती गायकवाड समितीने सादर केलेल्या अहवालाचा अभ्यास करून, त्यानुषंगाने शासनाने करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत शासनास मार्गदर्शन करील; (यामध्ये दोषी अधिकाऱ्यांविरुध्द दोष निश्चिती करून, संबंधितांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनास दिशादर्शन करणे, संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक असल्यास त्यावरील कार्यवाहीबाबत यथायोग्य शिफारशी करणे इ. बाबींचा समावेश असेल)
- ही समिती गायकवाड समितीने सादर केलेल्या अहवालाचा अभ्यास करुन, त्यामध्ये नमूद बाबी पुन्हा उद्भवू नयेत, म्हणून करावयाच्या उपाययोजनांबाबत शासनास शिफारस करील;

५. श्री.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीला त्यांच्या कामकाजासाठी, समिती मानधन व समितीच्या इतर खर्चासाठी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येत आहे:-

**(रु.लाखात)**

| अ.क्र. | खर्चाची बाब | तरतूद |
|---|---|---|
| १ | समिती अध्यक्षांचे मानधन (१.०० लक्ष प्रति महिना) व स्थानिक वाहन आणि वाहनभत्ता याकरीता (२५,०००/- प्रति महिना) सहा महिन्यांसाठी | ७.५० |
| २ | अध्यक्षांमार्फत समितीवर घेण्यात येणारे सहायक अधिकारी व अन्य मनुष्यबळ यांच्याकरीता मानधन सहा महिन्यांसाठी | १५.१२ |
| ३ | प्रवास खर्च सहा महिन्यांसाठी<br>(यामध्ये समितीचे अध्यक्ष व समिती मध्ये समाविष्ट सहायक अधिकाऱ्यांना शासकीय कामकाजाकरीता केलेल्या दौऱ्यावरील प्रवास भत्ता + महागाई भत्ता (T.A.+D.A.) यांचा समावेश राहील.) | ६.०० |

| अ.क्र. | खर्चाची बाब | तरतूद |
|---|---|---|
| ४ | कार्यालयीन खर्च | ६.०० |
| ५ | संचित तथा आकस्मिकता खर्च | ६.७१ |
| ६ | श्रीमती सानिका देशपांडे, उप संचालक (वित्त व लेखा सेवा), नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे (अतिरिक्त कार्यभार) म्हणून श्री.करंदीकर यांना सहाय्य करणार असल्यामुळे, त्यांना शासन नियमावलीनुसार अतिरिक्त वेतन र.१५००/- (रुपये पंधराशे फक्त) + स्थानिक वाहन व वाहनभत्ता याकरीता (रु.१५,०००/- अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) सहा महिन्यांसाठी | ०.९९ |
| | **एकूण** | **४२.३२** |

६. श्री.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीला त्यांच्या कामकाजासाठी उपरोक्त कोष्टकात नमूद केल्याप्रमाणे, रु. ४२.३२ लाख (रुपये बेचाळीस लाख बत्तीस हजार फक्त) इतका निधी, मागणी क्र.२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०२-अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६-आदिवासी क्षेत्र उप योजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१)(०१) आदिवासी विकास आयुक्तालय (२२२५ १३९३), १३-कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये (आवश्यकतेनुसार) नियंत्रक अधिकारी तथा आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना खर्च करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १८३/व्यय-१४, दिनांक १२.१०.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१७११०३१६४२५७८७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Yogesh A Sawant

Digitally signed by Yogesh A Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7cefaf50ac0e3c1b6570c758525237ee6d89f57ad6f8775d3c4a59d92d913372, cn=Yogesh A Sawant
Date: 2017.11.03 16:32:24 +05'30'

**( योगेश अ. सावंत )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता यांचे खाजगी सचिव, विधान सभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता यांचे खाजगी सचिव, विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

८. सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मुंबई,
९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
१०. सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
१२. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
१३. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक निरिक्षक, नवीन प्रशासन इमारत, कॉन्सिल हॉलच्या समोर, पुणे,
१४. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास,
१५. उप सचिव (व्यय-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास,
१७. श्री.पी.डी.करंदीकर, भा.प्र.से. (सेवानिवृत्त), जी-१५, अथश्री कॉम्प्लेक्स, मगरपट्टा, मुंढवा रोड, हडपसर, पुणे-४११०३६,
१८. श्रीमती सानिका देशपांडे, उप संचालक (वित्त व लेखा सेवा), नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे,
१९. निवड नस्ती.